**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४२/२०११**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.३**
**निशाणी क्र.१३३ पुढे सुरु**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना व त्यांचे विधीज्ञांना पुकारले असता गैरहजर. सबब, उलटतपास नाही.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.६ यांचेतर्फे विधीज्ञ श्री.डी.जे.जगदाळे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु</u>**

५. दावा मिळकतीचा गट नं.४४२ असा असावा पण निश्चित सांगता येणार नाही. वाद मिळकतीचे क्षेत्र २ एकर व गट नं.५१९ असा आहे. माझ्या वडीलांचे नांव श्रीकृष्ण. माझ्या वडीलांना रामकृष्ण व शामकांत हे दोन भाऊ होते. हे म्हणणे खरे आहे की, शामकांत हे दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट आहेत. रामकृष्णांना या दाव्यात पक्षकार का केले नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.५१९ व्यतिरिक्त रायगावला मला आणखी जमीनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ५१९ मध्ये सामाईकात विहीर व शंकराचे मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.५१९ चे वाटप हे शामकांत व श्रीकृष्ण यांच्यात झाले व पूर्वेकडचा हिस्सा शामकांत याना वाटून आला व पश्चिमेकडचा आम्हाला. श्रीकृष्णाच्या वाटयाला ४ हेक्टर ७० आर आले. हे म्हणणे खरे आहे की, श्रीकृष्ण २००७ साली मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यापूर्वीच माझी आई सरोज या मयत झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, श्रीकृष्णाला एकुण तीन मुले पैकी थोरला मी, नंतर हेमंत व धाकटा जयंत असे.

६. ५१९ ही पूर्व पश्चिम पट्टी आहे. हे म्हणणे खरे आहे की, या मिळकतीच्या उत्तरेस लागून हेमंतचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या उत्तरेस आमचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या उत्तरेस जयंतचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, ५१९ ही जमीन आम्ही तिघ भाऊ एकत्र जमीन कसत होतो. हे म्हणणे खरे आहे की, हेमंत यांना

वादी क्र.१ व २ व प्रतिवादी क्र.२ या मुली. हे म्हणणे खरे आहे की, या तिनही मुलींची लग्नं झालेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हेमंतची पत्नी ११.१०.२००८ रोजी मयत झाली. हे म्हणणे खरे आहे की, पत्नी वारल्यानंतर हेमंत हा रायगाव येथे एकटाच राहण्यास होता.
प्रश्न – त्याला डायबेटीस, कॅन्सर, ब्लडप्रेशर असा आजार होता ?
उत्तर – आजारी होता एवढं मला माहिती होतं.
हे म्हणणे खरे नाही की, तो आजारी असल्यामुळे त्याला शेती करणे जमत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे हेमंतने जमीन कसण्यासाठी मला द्यावी असे मला वाटत होते.

७. मला तीन मुली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या तीन मुली वादीच्या वयाच्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीचे विवाह झालेले आहेत. माझ्या मुलींचे विवाह मी स्वतः करुन दिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलींच्या लग्नासाठी मी कर्ज घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी, जयंत व हेमंतची परिस्थिती एकसारखीच.

८. हे म्हणणे खरे आहे की, हेमंतची थोरली मुलगी भक्ती हिला सोलापुर येथे दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिच्या नवऱ्याला कॅन्सरचा आजार आहे. तिच्या नवऱ्याचे व तिचे पटते का नाही याची मला कल्पना नाही.
प्रश्न – भक्तीकडे शेतीची अवजारे नाहीत ?
उत्तर – ती सोलापूरला असल्यामुळे मला काही माहिती नाही.
हे म्हणणे खरे नाही की, हेमंत जिवंत होते तेव्हा भक्तीचे गावी येणे जाणे कमी होते. हे म्हणणे खरे नाही की, भक्ती स्वतः रायगावची शेती पहात नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दुसरी मुलगी दिपाली हिला मलवडी, ता. माण, जि. सातारा येथे दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिपाली ही शेती करायला कधीही रायगावला आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुजा हिस रेवदांडा, अलिबाग येथे दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुजाचे पती हे धार्मिक विधीचे काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, पुजा कधीही रायगावला येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत जिवंत असताना त्यांच्या तीनही मुली त्यांची

देखभाल करत नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, हेमंत जिवंत असताना त्याची शेती, बँकेचे व्यवहार व देखभाल हे त्याचे पुतण्या स्वानंद जयंत देशपांडे व जयंत देशपांडे पहात होते. हे म्हणणे खरे आहे की, हेमंतला ब्लड प्रेशर, डायबिटीस असल्यामुळे सिम्बॉयसिस हॉस्पिटल, सातारा येथे अधूनमधून अॅडमिट करावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, हेमंत हा जनरल रबर कंपनी रायगाव येथे नोकरीस होता. त्याला औषधोपचारासाठी लागणारे पैसे तो कंपनीकडून उचल घ्यायचा का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजारपणामुळे त्याने कामावर जाणे शेवटीशेवटी बंद केले होते. हे म्हणणे खरे नाही की, हेमंतच्या नावावर सोसायटीचे एक लाख कर्ज होते. हे म्हणणे खरे नाही की, मुलींच्या लग्नासाठी हेमंतने लोकांकडून दीड लाख रुपये हातउसने घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत याला असलेले आजारपण, मुलींची लग्नं, हातउसने घेतलेले पैसे, सोसायटीचे कर्ज, औषधपाण्याचा खर्च व दैनंदिन गरजा भागवण्यासाठी दावा मिळकत प्रतिवादी क्र.६ व ७ यांना विकली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये खरेदी तारखेपासून प्रतिवादी क्र.६ व ७ यांची वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ ला प्रतिवादी क्र.६ व ७ यांची नांवे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत जमीन विकतोय याची माहिती मी हेमंतच्या सोलापुरच्या जावयाला दिली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत या प्रतिवादी क्र.६ व ७ यांना विकल्यानंतर त्या मिळकतीपैकी ४ गुंठे जमीन मी स्वतःकडे दाबून ठेवली होती.

प्रश्न – त्यामुळे प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी तुमच्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केली होती ?

उत्तर – खोटी तक्रार केली होती.

हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मला भुईंज पोलीस स्टेशनला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस पोलीसांनी मला हरकत अडथळा करु नका म्हणून समज दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, गायकवाडांनी माझ्या विरोधात तक्रार दिल्यामुळे त्याचा राग माझ्या मनात आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, वादींना दावा दाखल करण्यासाठी मीच मदत केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणेच सदरचा दावा तयार झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्याच्या संदर्भात मी अनेकवेळा कोर्टात येत असतो. मी या दाव्यात प्रतिवादी क्र.३ आहे. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यास मी माझी कैफियत दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींना जे अपेक्षित होते त्याप्रमाणे माझा जबाब तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या जमीनीपैकी ४ गुंठे क्षेत्र मला देण्याचे वादीने कबुल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज मी दिपालीच्या नवऱ्याच्या गाडीवर बसून आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन व वादीना मदत करण्यासाठी मी अ◌ाजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : २६.०९.२०२३

रविंद्र भ. खवले,

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**